## नाशिक महानगरपालिका, नाशिक
## राष्ट्रीय फेरीवाला धोरण
## जाहीर नोटीस

पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन ) अधिनियम, २०१४ च्या कलम ३६ च्या पोटकलम (१) नुसार मा .महाराष्ट्र शासनाने केलेल्या महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण चार नियम ११ च्या पोटकलम (४) (५) आणि नियम १२ मधील तरतुदींनुसार नाशिक महानगरपालिका नगर पथविक्रेता समितीवर नामनिर्देशनासाठी व्यापारी संघ या प्रवर्गातील व्यक्तींकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्ज करण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ह ता असून अर्जासोबत संबधित कागदपत्रे जोडणे आवश्यक राहील.

१) अर्जदाराचे वय २१ वर्षापेक्षा कमी नसावे.

२) अर्जदार हा मनपा करांचा थकबाकीदार नसावा.

३) अर्जदारास न्यायालयाने कोणत्याही गंभींर गुन्हयात शिक्षा ठोठावलेली नसावी.

४) संघाची संबधित सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणीं असणे आवश्यक आहे . अर्जासोबत नोंदणीचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडावी.

५) संघाचे मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडुन तयार करण्यात आलेले लेखापरिक्षा अहवाल अर्जासोबत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

६) संघास नाशिक महानगरपालिकेने काळया यादीत टाकलेले नसावे.

७) संघ त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायदयान्वये सिध्ददोषी नसावा.

८)संघाने सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.

याप्रमाणे अटीशर्ती पुर्ण करणा -या संघामार्फत्‍ इच्छुक व्यक्तीं नी सोबतच्या विहित नमुन्यात दिनांक ०९/०८/२०१७ पावेतो पोहचतील अशा प्रकारे अर्ज करावेत . विहित नमुन्यात नसलेल्या, अर्धवट व मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही , याची नोंद घ्यावी.

<u>अर्ज पाठवावयाचा पत्ता:-</u>

मा.आयुक्त,<br>
नाशिक महानगरपालिका, नाशिक<br>
राजीव गांधी भवन, शरणपुर रोड,<br>
नाशिक-४२२००१.

Sd/-

**अति. आयुक्त,**<br>
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

फोटो

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

नगर पथ विक्रेता समिती सदस्याकरीता अर्ज

[महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण चार नियम ११ च्या पोटकलम (४) (५) आणि नियम १२.]

| | |
|---|---|
| १)संघाचे नांव | :- ---------------------------------------- |
| २)संघाचा नोंदणी क्रमांक व दिनांक | :---------------------------------------- |
| ३)अर्जदाराचे पूर्ण नांव | :- ---------------------------------------- |
| ४)वय | :- ---------------------------------------- |
| ५)व्यवसाय /धंदा | :---------------------------------------- |
| ६)संपूर्ण पत्ता (उमेदवाराने आपला पोष्टाचा पत्ता नमुद करावा) | :- ---------------------------------------- ---------------------------------------- |
| ७)संघावरील कामाचा अनुभव | :- ---------------------------------------- |
| ८)शिफारस करणा-या संघांच्या पदाधिका-याचे नांव, पदनाम, व स्वाक्षरी. | :- ---------------------------------------- ---------------------------------------- |

## अर्जदाराचे करावयाचे घोषणापत्र

मी याव्दारे घोषित करतो/करते की, मी श्री/श्रीमती-----------------------------------, नगर पथ विक्रेता समितीवर सदस्य म्हणुन काम करणेसाठी संमती देत आहे. मी असेही घोषित करतो की,

१)माझ्या वयाची--------------------वर्षे पुर्ण झाली आहेत.

२)महानगरपालिकेस देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी माझे नांवावर शिल्लक नाही.

३)मला न्यायालयात कोणत्याही गंभीर गुन्हयातशिक्षा झालेली नाही. सोबत पोलीस खात्याकडील चारीत्र पडताळणीचा दाखला जोडला आहे.

४)मी वेळोवेळी शासनाचे नियमांचे पालन करीन.

५)संघाची सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असलयाचा दाखला जोडला आहे.

६)संघाच्या मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडुन तयार करण्यात आलेले लेखापरिक्षा अहवाल सोबत जोडले आहे.

७)संघाच्या सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असलेबाबतचा दाखला जोडला आहे.

दिनांक / /२०१७ अर्जदाराची सही किंवा अंगठा

(अर्जदाराने रहिवास पुरावा म्हणुन रेशनकार्ड/आधारकार्ड/बँकेचे पासबुक पहिले पान/लीईटबील (अदयावत) /वाहन चालविण्याचा पुरावा यापैकी एकाची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.)